IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे धार्मिक विचार

**श्री. ब्रह्मदेव विठ्ठल शिंदे**
संशोधक विद्यार्थी, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
एम. ए. इतिहास सेट, नेट, एम. ए. राज्यशास्त्र सेट, एम. ए. अर्थशास्त्र सेट, डि.एड.
पत्ता – मु. पो. रोपळे बु. ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*धार्मिक विचार, संतांची शिकवण, धर्मविषयक प्रबोधन*

**ABSTRACT**

बडोद्याचे संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे कार्य आधुनिक भारताच्या पायाभरनिमध्ये मोलाचे महान असून त्यांचे धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासामधील कार्य अतुल्य आहे. इतिहास, धर्म, समाजशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान अशा विविध ज्ञान शाखांचा गाढा अभ्यास असणारे सायाजिराजे विविध प्रदेशातील प्रवास यामुळे अधिकाधिक विचारिक प्रगल्भ व पुरोगामी होत गेले. त्यांनी बौद्ध, जैन, ख्रिश्चन झोराष्ट्रीयन, इस्लाम इत्यादी धर्मांचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास व चिंतन करून त्यातील अंतर्विरोध समाजापुढे मांडून सर्व धर्मांचे मूलतत्त्व मानव कल्याण हेच आहे असे त्यांनी आपल्या अभ्यासातून स्पष्ट केले. तात्कालीक भारतामध्ये धर्मविषयक प्रगल्भ समजल्या जाणाऱ्या समाजसुधारकांशी सयाजीरावांचे असलेले नाते अगदी स्पष्टपणे आढळून येते. सयाजीरावांची धर्मचिकित्सा व धर्मविषयक विचार त्यातून त्यांनी मांडलेले तुलनात्मक धर्मचिंतन याचा उहापोह घेण्याचा प्रयत्न केला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shinde, B. V. (2025). महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे धार्मिक विचार. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 1928–1932.

**प्रस्तावना**:

एक आदर्श शासनकर्ता म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव भारताच्या इतिहासाच्या अजरामर आहे. समाजाच्या विकासामध्ये धर्माची भूमिका कायमच महत्वपूर्ण राहिली आहे. सयाजीरावांचे चौफेर वाचन, सर्वसंग्रहकता, बुद्धीची परिपक्वता, निरनिराळ्या धर्माचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे विचार प्रगतशील होत गेले. त्यांचा व्यासंग त्यांच्या लिखाणातून, भाषणातून, पत्रव्यवहारातून आपणाला स्पष्टपणे दिसून येतो. संतांची शिकवणी प्रमाणेच सयाजीरावांनी बडोदा संस्थानामध्ये पर्यायाने भारतामध्ये अनेक प्रकारची धार्मिक कार्य करून समाजाला एक नवी दिशा देण्याचे कार्य केले. सदर संशोधनामध्ये सयाजीरावांच्या धार्मिक विचारांची प्रगल्भतता दर्शवते.



**महाराजा सायाजीराव गायकवाड (तृतीय) (छायाचित्र Google)**

**सयाजीराव गायकवाड यांचे धार्मिक विचार:**

**१) सर्व धर्मांविषयी सहिष्णुता व जागृतता:-**

सयाजीराजांनी हिंदू धर्माबरोबर जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन झोराराष्ट्रीयन धर्मातील अनेक पुस्तकांचे वाचन केले. तसेच त्यातील अनेक पुस्तकांचे मराठी व गुजरातीत भाषांतर करण्याचे काम केले. एवढेच नव्हे तर प्रत्येक धर्माचे आदर्श तत्त्वे शिकवणारा वर्ग सुरू केला व त्यासाठी विशेष निधीची तरतूद सुद्धा सयाजीराजांनी आपल्या कालखंडात केली होती.

**२) मध्यस्त किंवा दलालाची आवश्यकता नाही:-**

सयाजीराव म्हणत की, सर्व धर्मीयांबद्दल आदर बाळगावा परंतु कोणत्याही धर्माने रूढी परंपरेचे पांघरून घेऊन थोतांड किंवा माणसांची फसवाफसवी करू नये. प्रत्येक माणसाला धर्म स्वतंत्र्य आहे, पण त्यासाठी कोणत्याही मध्यस्थीची किंवा दलालाची आवश्यकता असत नाही. महाराजांनी अनेक अभ्यासू व्यक्तींकडून सर्वधर्मातील ग्रंथाचे सार समजून घेतले. त्यातूनच त्यांनी वेदोक्ताचा अधिकार केवळ ब्राह्मणास नाही असे सांगितले. प्रत्येक माणूस ईश्वराचे लेकरू आहे. ईश्वराची पूजा प्रार्थना करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. कोणत्याही जातीची ती मक्तेदारी नाही. दुसऱ्यांनी वेदोक्त योजना वापरावी यालाही धर्मशास्त्रानुसार कोणताही आधार नाही, हे सयाजीरावांनी ओळखले होते. यावर उपाय म्हणून 1896 मध्ये ब्राह्मनेतरांसाठी मराठीतून वेदोक्त शाळा सुरू केली.

**३) पूजा करण्याचा अधिकार:-**

शंकर मोरे रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ भाऊ मस्त यांच्यावर धार्मिक पूजांचे अर्थासहित विश्लेषण करण्याची जबाबदारी दिली होती. या त्रयींनी धर्मविधींचा तपशीलवार शास्त्र विशद करणारा 'ऐनेराजमेहेल' हा ग्रंथ तयार केला. राजवाड्यात ते वेदोक्त पद्धतीने पूजा करीत असत त्यासाठी पूजा विधीचे सर्व संस्कृत ग्रंथ मराठी व गुजराती मध्ये छापले गेले. सदर बाब काही सनातनी व्यक्तींना आवडली नाही. त्यातून असंतोष वाढू लागला, परंतु हा प्रश्न सयाजीरावांनी सामंजस्याने व मध्यम मार्गाने कुशलतेने हाताळला. एखाद्या व्यक्तीला एखाद्या व्यवसाय करायचा झाल्यास त्याला त्या व्यवसायाचे ज्ञान हवे. उदाहरणार्थ डॉक्टर, इंजिनियर,

वकील हे त्या व्यवसायाचे शिक्षण घेतात, परीक्षा पास होतात आणि त्यानंतर व्यवसाय चे प्रमाणपत्र त्यांना मिळते. अशाच पद्धतीने राजांनी पुरोहित पुरोहित धर्मशास्त्रानुसार पूजाविधीचा अभ्यास करणाऱ्याला आणि प्रमाणपत्र मिळवणाऱ्याला पूजाविधी करण्याचा अधिकार दिला. तसेच संस्कृत मधील पूजा मंत्राविषयी विषयी यजमानास त्याच्या भाषेत भाषेत सांगण्याची सक्ती कायद्यानुसार केली होती. संन्यास घेण्यासाठी नियम तयार करण्यात आले संन्यासांमुळे ऐदी लोकांची वाढ होते, त्यामुळे काम करणारी माणसे कंकाल होतात. हे त्यांनी ओळखले होते. त्यांनी धर्म शिक्षणाबरोबरच नैतिकतिचे शिक्षण मुलांना दिले पाहिजे याचे समर्थन केले. माणसाने माणसाला माणसाप्रमाणे वागण्यास धर्माने मदत केली पाहिजे.

**४) ईश्वर विषयक विचार:-**

सयाजीरावांनी धर्मसंस्था व राज्य संस्थेने आपापली लक्ष्मण रेषा ओळखली होती, ते म्हणत. ईश्वराची नेमकी व्याख्या काय करावी? आणि परिवर्तनशील जगात धर्माचे स्थान काय आहे? हा विचार ते वेळोवेळी स्पष्ट करून सांगत आले. दुसऱ्या जागतिक सर्वधर्मपरिषदेचे अध्यक्षस्थान सयाजीराव गायकवाड होते. ते याच जागतिक सर्वधर्मपरिषदेत स्पष्ट म्हणाले, ईश्वर ही मनुष्यनिर्मित कल्पना असून तो लोकसत्ताक राज्यातील राजासारखा गरिबांचा कैवारी असा असतो, त्यांचे हे विचार सर्वधर्मसमभाव व समतेचे संदेश देणारे आहेत. परमेश्वर हा सच्चिदानंद स्वरूप असून जन हे त्याची वेशभूषा आहे अशी देव संकल्पना त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. चार्वाक, गौतम बुद्ध, श्रीकृष्ण, त्याचबरोबर संत कबीर, तुकाराम, ज्ञानेश्वर व तुलसीदास इत्यादी संतांनी जे धार्मिक दृष्टी दाखवली, ती महत्वाची आहे.

**५) धर्मग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास:**

बडोद्याच्या कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान आणि तुलानात्मक धर्म अभ्यासाचे जगातील पहिले अध्यासन सयाजीराव यांनी १ ऑगस्ट १९१६ रोजी सुरू केले. याच अध्यासनाच्या वतीने १९१८ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'गायकवाड स्टडीज इन रिलीजन अंड फिलॉसॉफी' या ग्रंथमालेल बौद्ध, हिंदू, ख्रिश्चन, इस्लाम इत्यादी धर्मावरील ग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास व नीतीशास्त्र या विषयावर एकूण १७ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. आजवरच्या जगाच्या इतिहासातील अशा प्रकारची एकमेव ग्रंथमाला आहे.

**६) धर्मविषयक प्रबोधन:**

सयाजीराजांनी 'डिप्रेस्ड क्लासेस' हा इंग्रजी निबंध १९०९ मध्ये लिहिला होता, त्याद्वारे धर्मसाक्षरतेचे व प्रबोधनाचे महाभियान सुरू केले होते. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्यता हा राष्ट्रीय प्रश्न आहे ही ऐतिहासिक मांडणी सयाजीरावांनी भारतात सर्वप्रथम केली होती. यामध्ये त्यांनी अस्पृश्यता युक्त भारत म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या आहे असे मांडले.

**७) स्वामी हंसस्वरूप याचे मतपरिवर्तन:-**

सयाजीरावांच्या धार्मिक सुधारणेस व विचारधारेस विरोध करणारी काही मंडळी सयाजीरावांवर नाराज होती, त्यामुळे त्यांनी स्वामी हंसस्वरूप यांना सप्टेंबर 1901 रोजी निमंत्रण दिले होते. स्वामीजींनी सनातन धर्माबद्दल देशभर व्याख्याने देऊन प्रचार प्रसार केला होता. स्वामीजी येण्यापूर्वी सयाजीरावांनी आर्य समाजाचे साधू नित्यानंद यांची व विश्वेशावानंद यांची अनेक भाषणे बडोद्यामध्ये आयोजित केली होती, त्यामुळे त्यांना आर्य समाजाची विचारधारा पटत होती. त्यातूनच त्यांनी आर्य समाजाचे कार्यकर्ते पंडित आत्माराम यांना शिक्षण विभागात इन्स्पेक्टर म्हणून नेमले होते. महाराजांनी अस्पृश्य, आदिवासी, वंचित समाजासाठी शाळा, वस्तीग्रह काढले होते. महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या समाज सत्यशोधक चळवळी सयाजी राजेंना विशेष आकर्षण वाटे, त्यामुळेच त्यांनी महात्मा फुले यांना मदत केल्याचे आढळते. सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते रामचंद्र धामनसकरांना त्यांनी बडोद्यात महत्त्वाच्या पदावर नोकरीस घेतली होते, पुढे ते बडोद्याचे दिवाणही झाले. अशा सामाजिक पार्श्वभूमीवर स्वामी हंसस्वरूप या प्रकांड पंडित माणसाची व्याख्याने बडोद्यात होऊ लागली. त्यासाठी माणसांची प्रचंड गर्दी होत असे. स्वामी हंसस्वरूप म्हणत की, राज्यकर्त्यांनी धर्मरक्षणासाठी नव्या सुधारणा दूर ठेवल्या पाहिजे. सदर भाषणाचा वृत्तांत अनेक वृत्तपत्रांनी प्रकाशित केला. सयाजीराजांच्या कामाविरोधात हे एक प्रकारचे आव्हान होते. त्यावर त्यांनी स्वामी हंसस्वरूप यांना राजवाड्यात सन्मानाने बोलवून त्यांची व्याख्याने आयोजित करण्याचे ठरवले. बडोद्याच्या राजवाड्यात दिवाणखान्यात रात्री नऊ ते साडेदहा वेळेत स्वामींची व्याख्यान आयोजित करण्याचे ठरले. सयाजीरावांनी स्वामीजींचे स्वागत केले व त्यानंतर म्हणाले "आजवरच्या सनातनी ढोंगांनिच हि प्राचीन भारतभूमी अधोगतीस केलेली आहे त्यामुळे पाश्चात्य ज्ञान व शस्त्रांचा अवलंब करणे, आजची गरज आहे. यावर यावरच

हंसस्वरूप महाराजांनी विनंती केली की, आपण प्रथम माझे व्याख्यान ऐकावीत त्यानंतर आपण यावर चर्चा करू. त्यावर महाराजांनी विचारलले “किती व्याख्यानात आपला विषय मांडणार आहात”. स्वामी म्हणाले पाच दिवसात बोलून विषय संपतील. यावर सयाजीराजांनी होकार दिला. राजवस्त्र देऊन स्वामींचा गौरव केला. ठरल्याप्रमाणे स्वामी बोलायला उभे राहिले, त्यांच्या भाषेवरील प्रभुत्वाने श्रोत्यांवर प्रभाव पडत असत, तास दीड-तासाच्या भाषणांमध्ये त्यांनी सनातन हिंदू धर्माची महती व श्रेष्ठत्व स्पष्ट केली. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशीच सयाजीराव धामणसकरांना म्हणाले “दोन व्याख्याने ऐकून माझे असे मत झाले आहे की, स्वामीजींची वित्वत्ता आणि वाचन अगदी यथातथाच आहे. वकृत्वाच्या जोरावर त्याच्या ठसा पडतो, परंतु ठोस मुद्दे अजून भाषणातून आले नाहीत. पाच व्याख्याने संपून गेले स्वामीजींनी विजयमुद्रेने महाराजांकडे पाहिले. सयाजीरावांनी त्यांना विचारले ‘आपले सांगणे संपला आहे का? स्वामींनी होकार दिला. त्यानंतर सयाजीराव म्हणाले ‘आपण सर्वांनी स्वामींची पाच दिवस व्याख्याने ऐकली. आपली त्याबद्दल किंवा याविरुद्ध कोणास काही सांगणे असेल तर पुढे याआणि बोला. सगळे स्तब्ध होऊन एकमेकांकडे बघत असताना स्वामीजींच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. एव्हाना रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते, तरीही उपस्थित मंडळींनी सयाजीरावांचे अस्खलित इंग्रजीतील दीड तास भाषण ऐकले. शेवटी सयाजीराव म्हणाले ‘मी सगळ्यांना खूप वेळ ताटकळत ठेवले, त्यामुळे माफी असावी. त्यानंतर हंसस्वरूप स्वामी पुन्हा उभे राहिले आणि म्हणाले ‘महाराज मला आपले विचार मान्य आहेत, आपल्याला विरोध करण्याची माझ्यासारख्याची योग्यता नाही. रात्रीचे बारा वाजून गेले होते. अशा प्रकारे दरबार संपला. या घटनेचा इतिवृत्तांत बाळ गंगाधर टिळक यांच्यापर्यंत जेव्हा पोहोचला, तेव्हा त्यांनी 1 ऑक्टोबर 1901 रोजी ‘श्री गायकवाड सरकार यांचा वेदांत’ या शीर्षकाखाली केसरीमध्ये अग्रलेख लिहिला. त्यात त्यांनी सयाजीरावांनी हंसस्वरूप स्वामींच्या मतांचे केलेले खंडन यावर नाराजी दर्शवली. बडोद्याचे दिवाण रामचंद्र धामणसकर यांना टिळकांची भूमिका आणि सयाजीरावांवर केलेली टीका आवडली नाही. यासाठी सयाजीरावांनी टिळकांच्या अग्रलेखाला उत्तर पाठवावे, असा आग्रह धरला. त्यावर सयाजीराजे म्हणाले ‘वेदांत विषयावर आम्हाला बोलण्याचा अधिकार नाही, असे टिळक म्हणतात तर ते मान्य करून या विषयाचा मी आणखी अभ्यास वाढवणार आहे. देव देवतांबद्दल गरीबांना लुबाडणाऱ्यांना ढोंगी साधू आणि लफंगे यांच्याबद्दलचे माझे मत कायम आहे. यावर आपण उत्तर नाही पाठवायचे. टिळकांनी अग्रलेखाच्या सुरुवातीचा आम्हाला सुशिक्षित आणि विद्यावासंगी म्हटले अही यातच सर्व आले. टिळकांचे राष्ट्रकार्यापुढे हि टीका वैयक्तिक व किरकोळ स्वरूपाचे आहे त्याकडे आपण लक्ष देऊ नये’

**८) संत विचारांची जोपासना:-**

तरुणपणापासूनच नवनवे ग्रंथ मिळवून ते वाचन करणे, त्यानुसार टिपण काढणे हे सयाजीरावांचा व्यासंग होता त्यामुळे त्यांची दृष्टी प्रगल्भ होत गेली. संत तुकाराम हे त्यांचे आवडते कवी होते. त्यांचे सहकारी अधिकारी कासेराव जाधव लिहून ठेवतात की, संत तुकारामांचे गाथेचे अनेक पारायण सयाजीराजांनी करून घेतली. 1899 साली भयानक दुष्काळ पडल्याने माणसे जनावरे यांची उपासमार सुरू झाली. या काळात सयाजीरावांनी दुष्काळी भागात बैलगाडी आणि घोड्यावर बसून दौरा केला. माणसांना व जनावरांना अन्न व चारा पुरवण्याचे काम केलं. दुष्काळी कामे सुरू केली ते रात्री तंबूत मुक्काम करत असताना तुकारामांचे अभंग वाचन करत. दुष्काळासंबंधीच्या तुकारामाचे अभंगाने ते अस्वस्थ व विचारी होत असतात.

**निष्कर्ष:**

आदर्श संस्थानाच्या निर्मितीसाठी आदर्श धार्मिक विचार असणे व धर्माबाबत सहिष्णूता व पुरोगामी असणे किती मोलाचे ठरते यांचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे बडोदा संस्थान होय. धर्मामध्ये कालानुरूप बदल करणे धर्म संस्थेचे व राजसत्तेचे कर्तव्य असते. अन्यथा तो धर्म अधोगतीस लागतो. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सर्व धर्मांचा चिकित्सक अभ्यास करून आपल्या संथानातील प्रजेस विशिष्ठ दिशा देण्याचे महान कार्य केले.सर्व धर्मातील चांगला सार एकत्र करून मानवधर्माची स्थापना होणे काळाची गरज आहे. राष्ट्र व समाज दोहोंनाही मानवधर्म मदत करेल असे सयाजीराजे म्हणत. सायाजीराजांच्या अश्या धर्म सुधारणेतील अतुल्य विचारामुळे ते जागतिक धर्म प्रबोधन परंपरेतसुद्धा केवळ पथदर्शक नसून क्रांतिकारकही ठरतात.

**संधर्भ ग्रंथ:**

१. बाबा भांड, (२०२१), सयाजीराव गायकवाड यांचे धार्मिक विचार, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद.
२. बाबा भांड, (२०२२) महाराजा सयाजीराव- गाथा युगपुरुषाची, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
३. देवदत्त कदम (२०२१), महाराजा सायाजीराव तुलनात्मक धर्मचिंतन, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद.
४. सुरक्षा घोंगडे, (२०२१), महाराजा सयाजीराव आणि स्वतंत्र धर्म खाते, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
५. सौरभ गायकवाड,(२०२१), महाराजा सायाजीराई आणि बौद्ध धर्म, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
६. डॉ. राजेंद्र मगर, (२०२१), महाराजा सयाजीराव आणि दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
७. देवदत्त कदम (२०२१), महाराजा सायाजीराव आणि हिंदू पुरोहित करडा, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद.